**<u>म.कौ.हिं. संरक्षण अर्ज क्रमांक ६३/२०१८</u>**

**<u>निशाणी क्रमांक २४ खालील आदेश</u>**

(सौ. प्रज्ञा कदम वि. श्री. रामचंद्र कदम वगैरे)

सीएनआर क्र. MHRT030016942018

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांनी प्रस्तुत प्रकरणाच्या कोर्टाच्या प्रत्येक तारखेस त्यांच्या मुलीला भेटण्याची परवानगी त्यांना मिळावी याकरिता म्हणून दाखल केलेला आहे.

२. सामनेवाला यांचे अर्जातील कथन संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे –

अर्जदार व त्यांचा दिनांक १४.०२.२०१६ रोजी झालेला आहे. सदरच्या विवाहातून अर्जदार व सामनेवाला यांना एक मुलगी झाली. तिचे नाव रुची असे ठेवण्यात आले. सध्य परिस्थितीमध्ये कु. रुची ही अर्जदार हिचेसोबतच राहत आहे. अर्जदार हिने मुलगी कु. रुची हिला सामनेवालानपासून दूर ठेवून मुलीच्या प्रेमापासून सामनेवाला याला वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे सामनेवालाने प्रस्तुतचा अर्ज करुन मुलगी रुची हिला भेटायचे आहे व रुचीला सुध्दा तिच्या वडिलांना व आजोबांना प्रत्येक तारखेस भेटण्याची परवानगी न दिल्यास मुलीच्या कोमल मनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मे. न्यायालयाने मुलगी रुचीला प्रत्येक तारखेस भेटण्याचे आदेश करण्याबाबत सामनेवालाने विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल करुन नमुद केले की, प्रस्तुत प्रकरण हे कायदयातील तरतुदींप्रमाणे दाखल केलेले आहे. त्याचा विचार करता सामनेवाला यास याकामी दाद मागण्याची तरतुद नाही. अर्ज कोणत्याही तरतुदीप्रमाणे टिकणारा नाही. सामनेवाला यास तशी स्वतंत्र मागणी करण्याची कायद्यात स्वतंत्र तरतुद आहे. तरी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती अर्जदार यांनी केलेली आहे

४. दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदार ही सध्य स्थितीत तिच्या मुलीसह राहत असून सामनेवालापासून विभक्त राहत आहे ही बाब दोन्ही पक्षकारांना मान्य आहे. कु. रुची ही अर्जदार व सामनेवाला या दोघांचीही मुलगी असून सामनेवाला याचा देखिल कु. रुची हिचेवर प्रेम करण्याचा वडील म्हणून हक्क आहे तर रुची हिला देखिल तिचे वडिलांचे प्रेम मिळणे तिचा नैसर्गिक न्यायअधिकार आहे. कु. रुची ही अज्ञान असुन तिचा ताबा अर्जदारकडे असल्यामुळे तसेच अर्जदार व सामनेवाला हे विभक्त राहत असल्यामुळे साहजिकच वडील या नात्याने सामनेवाला याला देखिल त्याच्या मुलीला भेटावे असे वाटत असेल यात काही दुमत नाही. तसेच सामनेवाला याला कु. रुची हिला भेटणेस मुभा दिली तर त्यामध्ये अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता सामनेवाला यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना असे निर्देशित करण्यात येते की, अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणाचे न्यायालयीन तारखेच्या दिवशी कु. रुची हिला सोबत घेऊन यावे व सामनेवाला याला कु. रुची हिला भेटण्याची मुभा दयावी. त्याबाबत दोन्ही पक्षकारांनी मुलगी कु.रुची व सामनेवाला यांच्या भेटीसाठी आपसांत सोयीप्रमाणे योग्य ते ठिकाण निवडावे.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR

Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2021.11.25 17:50:58 +0530

**रत्नागिरी**
**दिनांक–२३/११/२०२१**

**( श्रीम. पी.एस.गोवेकर )**
**५वे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**रत्नागिरी.**

I affirm that the contents of this PDF file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. M. N. Patil |
| Court Name | : | $5^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ratnagiri |
| Date of Judgment | : | 23/11/2021 |
| Order Signed by P.O. on | : | 25/11/2021 |
| Order uploaded on | : | 25/11/2021 |